# गौतमी

## (द्रोणपत्नी गौतमीच्या उपेक्षित जीवनाची कहाणी)

**अनंत तिबिले**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**गौतमी : अनंत तिबिले**

**© शितल मेहता**
कोल्हापूर.

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शितल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रविंद्र सावंत

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**आवृत्ती**
नोव्हेंबर, २०१२

**किंमत**
रुपये २२०/-

# गौतमी

# एक

राजप्रासादालगतच्या उपवनात आम्ही सगळ्याच जणी खेळत होतो. मी, अनुपमा, उत्तमा. सगळ्याच माझ्या वयाच्या. सगळ्या माझ्याच वयाच्या जरी असल्या तरी त्यांच्यात नि माझ्यात तसं खूपच अंतर होतं. वय सारखं असलं म्हणून वयाने का माणसाची बरोबरी करता येते? त्यांच्यात नि माझ्यात तसंच होतं. बहुतेक सगळ्या सामंतांच्या मुली होत्या. त्यांतील प्रत्येक जण राजप्रासादालगतच्या लहानमोठ्या प्रासादातच राहात होत्या. प्रत्येकीला माता, पिता, बंधू, भगिनी, सारं काही होतं. हवं ते हवं तेवढं खावं, उंची वस्त्रं ल्यावी आणि मनसोक्त खेळावं, एवढंच त्यांचं काम. पण मी?

तसं पाहिलं तर मी अनाथच. एका बंधूशिवाय मला दुसरं कुणीच नाही. राजप्रासादाच्या आश्रयाला राहातो हा केवळ शांतनू महाराजांचा कृपाशीर्वाद. यदाकदाचित त्यांनी इच्छा केली, तर ते केव्हाही आणि कोणत्याही क्षणी, मला आणि कृपाला रस्त्यावर उभे करू शकतील. अनाथ, पोरकी म्हणून माझ्या बंधूचं नाव कृप आणि मी कृपी. जोपर्यंत काही कळत नव्हतं तोपर्यंत या नावांबद्दल

मला काहीच वाटत नव्हतं. पण अनाथांना लवकर समज येते असं म्हणतात. माझ्याबाबतीत ते अगदीच खरं ठरलं. मला कळायला लागलं आणि मी उगाचच माझ्या बंधूच्या आणि माझ्या नावाचा वेध घेऊ लागले. उत्तमा, अनुपमा या नावांचे अर्थ मला कळत नव्हते आणि कळत नाहीतही. परंतु कृप आणि कृपी ही नावं मला पहिल्यापासूनच काहीतरी वेगळी वाटायची. मी माझ्या बालसुलभ - चौकस बुद्धीप्रमाणे या नावांचा अर्थ शोधायचा प्रयत्न करायची. पण काही केल्या अर्थच सापडायचा नाही. इतर कुणाला काही विचारण्याचे धाडस नसल्याने मी कुणासमोरच उभी राहायची नाही. कुणाला काही विचारण्याचे साहसही करवायचे नाही मला.

अगदी परवाच नाइलाजाने मी कृपाला म्हणाले, ''कृपाऽऽऽऽ''

''काय?''

''एक विचारू तुला?''

''विचार ना?''

''तुझं नाव कृप आणि माझं कृपी. काय रे यांचा अर्थ? मी खूप शोधायचा प्रयत्न करते, पण मला सापडतच नाही.''

''कृपी, एक सांगू तुला? तू हा अर्थ जाणून घ्यायचा प्रयत्न करू नकोस.''

''पण का?''

''सांगितलं ना! या नावाचे अर्थ तुला जखमा केल्याशिवाय राहायचे नाहीत.''

कृप माझ्याच वयाचा. आम्हा दोघांच्यात खूपच साम्य. आम्ही भावंडंच असल्याने आमच्यात फारसा फरक असण्याचं कारण नाही. पण तरीही आमच्यातलं विलक्षण साम्य बघून आमच्या शेजारपाजारचे लोक आम्हांला 'जुळी' या नावाने ओळखतात. मला त्याचा अर्थ कळत नाही आणि मी तो शोधायचा प्रयत्नही करीत नाही. मी फक्त एवढंच जाणते, कृप माझ्याच वयाचा आहे. माझ्यासारखाच आहे आणि तो माझा बंधू आहे.

पण कृप बाहेर वावरतो ना? वेदाभ्यासासाठी आश्रमातही जातो, काही मोठमोठे संस्कृत श्लोकही मुखोद्‌गत म्हणून दाखवतो. बऱ्याच आश्रमकुमारांच्या सहवासात राहातो. त्यामुळे की काय, वयाने नसेना का पण ज्ञानाने तो माझ्यापेक्षा काहीसा मोठा वाटतो. संधी सापडेल त्या वेळी तो मला समजावण्याचा प्रयत्न करतो. कधी मी अस्वस्थ दिसले तर मोठेपणाच्या अधिकारानं माझं दुःख जाणून घेण्याचा



प्रयत्न करतो. मला सहानुभूती दाखवतो. माझी तेवढ्याच आपुलकीने चौकशीही करतो. त्या वेळीही त्याने मला मृदू शब्दांतच गप्प केले. पण म्हणून काही कृप वा कृपी या शब्दांचा अर्थ शोधण्याचे मी सोडून दिले नाही. दुसऱ्या दिवशी हा प्रश्न मी उत्तमेला विचारला.

''उत्तमाऽऽ''

''काय गं?''

''माझं नाव कृपी हे तुला ठाऊक आहे ना?''

''नसायला काय झाले? आम्ही तुला रोजच या नावाने हाक मारतो.''

''कृपी या शब्दाचा अर्थ तुला ठाऊक आहे.''

''नव्हता. पण मी एकदा तातांना विचारला?''

''सांगितला तुला तुझ्या तातांनी त्याचा अर्थ?''

''हो.''

''मग मला सांग ना.''

''कृपी, तू आणि तुझा बंधू दोघेही अनाथ. लहानपणी एका आश्रमात शांतनू महाराजांना तुम्ही दिसलात. तुमचं कोवळं वय पाहून त्यांना तुमची दया आली. त्यांनी सेवकांकरवी तुम्हाला या राजप्रासादात आणलं. महाराजांचीच कृपा झाल्याने लोक तुझ्या बंधूला कृप आणि तुला कृपी या नावाने ओळखू लागले.''

मी गंभीर झाले. मला अगदी अलीकडचाच प्रसंग आठवला. कुणा सामंताच्या घरी कन्या जन्माला आलेली होती. तिचा नामकरण समारंभ होता. हस्तिनापुरातल्या सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांना, सामंतांना, एवढंच काय शांतनू महाराजांनादेखील निमंत्रण देण्यात आलं होतं. राजप्रासादालगतच त्या सामंतांचा प्रासाद असल्याने प्रासाद सजविण्यात आला होता. प्रसादासमोर भव्य मंडपही उभा होता. लोकांनी दाटी केलेली होती. उंची वस्त्रे आणि सुवर्णालंकार ल्यालेल्या स्त्रियांचीही संख्या काही कमी नव्हती. वाद्ये वाजत होती. लोकांच्या आनंदाला आणि उत्साहाला उधाण आलेले होते. घरातले स्त्री-पुरुष इकडे तिकडे घाईगर्दीने वावरत असलेले दिसत होते. मिष्टान्न शिजवले जात होते, मिष्टान्नाचा सुगंध दूरपर्यंत पसरलेला होता आणि या अशा अवस्थेतच त्या प्रासादात नव्याने जन्माला आलेल्या कन्येचे नामकरण करण्यात आले होते.

मला या प्रसंगाची आठवण झाली आणि मी स्वतःलाच विचारू लागले.

'मीही कन्या आणि तीही कन्याच. तिचे नामकरण मात्र एवढ्या थाटामाटाने व्हावे, प्रासाद शृंगारण्यात यावा, लोकांनी गर्दी करावी. पक्वान्न शिजविण्यात यावीत आणि माझ्या? त्यातलं एकसुद्धा माझ्या वाट्याला येऊ नये? हे असं का? अनाथ म्हणून जन्माला आले हा का माझा दोष? कृपी हे नाव ठेवण्याचा लोकांना अधिकारच काय? मला हिणवण्यासाठी तर माझं कृपी हे नाव ठेवण्यात आलेलं नाही ना? आयुष्यभर शांतनू महाराजांचे उपकार सतत टोचत राहावेत म्हणून तर मला कृपी या नावाने संबोधित नसतील ना?'

एक की दोन, असंख्य प्रश्न, पण उत्तरच नव्हते त्याचे मजपाशी. हे प्रश्न कृपालाही विचारण्याचे साहस नव्हते. कारण कृपाचा स्वभावही मला ठाऊक होता. मी जन्मतःच स्त्री म्हणून हळवी होते आणि कृप पुरुष असूनदेखील त्याला आपल्या परिस्थितीची जाणीव होती, म्हणून की काय तोही हळवाच होता. कित्येक वेळा मी पाहिलंय हे. माझ्या पायात काटा बोचला तर टचकन पाणी त्याच्या डोळ्यांत गोळा व्हायचे. मला काहीही हवे असेल आणि ते जवळ नसेल तर तो दिवस दिवस अस्वस्थ राहायचा. सबंध दिवस त्याचे कशातच लक्ष असायचे नाही.

अशा कृपाला आपल्या नावांच्या अर्थाचा इतिहास सांगायचा म्हणजे कळत नकळत त्यालाही दुखवायचे. दुःख नाहीतरी स्वतःपाशी ठेवावं. इतरांना सांगूच नये ते. त्यामुळे इतरांच्या आनंदाला दृष्ट लावण्याचं पाप आपल्या माथी येतं.

उपवनात सगळ्या खेळत होत्या. खेळातला आनंद लुटत होत्या. पण मी मात्र उपवनाच्या एका कडेला वृक्षाच्या सावलीत बसून आपल्या सख्यांकडे एकटक पाहात त्यांच्यातल्या आणि माझ्यातल्या फरकाची नोंद करीत होते. त्यांच्या अंगावरील तलम रेशमी वस्त्रं मला निश्चितच बोचत नव्हती. मात्र ती मला न देणाऱ्या आणि अनाथ म्हणून मला जन्माला घालणाऱ्या परमेश्वराचा मात्र मला मनोमन राग येऊ लागला होता. मी मनोमन त्यालाच शिव्या देत होते आणि स्वतःच कृपी या नावाची हेटाळणी करीत होते.

कृप नुकताच स्नान करून आलेला होता आणि नेहमीप्रमाणे कोपऱ्यात मृगाजिनावर पद्मासन घालून बसण्याच्या तयारीत होता. तो एकदा असा बसला की, बराच वेळ त्याच मंत्रपठण चालणार याची मला कल्पना होती. जे काही बोलायचे ते त्या आधीच बोलावं अशी माझी इच्छा होती. मात्र त्याचं माझ्याकडे लक्षही नव्हतं. तरीही मी साहस केलं आणि हाक मारली, ''कृपाऽऽ''



''काय गं?''

''माझ्या सख्या पाहिल्यास तू?''

''कसं शक्य आहे ते? कृपी, तुझ्या सख्या पाहायला मला अवसर तरी मिळतो का? तू पाहातेस, वेदाभ्यास आणि शस्त्रास्त्रविद्याध्ययन यात माझा सबंध दिवस कसा जातो ते माझे मलाच कळत नाही.''

''मग एकदा बघच तू त्यांना.''

''पण का सांग ना?''

''त्यांना पाहिलेस तर त्यांच्यातला आणि माझ्यातला फरक तुला लगेचच कळेल.''

''असा काय फरक आहे त्यांच्यात नि तुझ्यात?''

''सांगू? रागावणार नाहीस ना?''

''सांग, खरंच रागावणार नाही मी तुझ्यावर.''

''कृपा, माझ्या केसांच्याकडे कधी लक्ष गेलंय तुझं? केवढा विपुल केशसंभार आहे माझा! अरे, माझ्या सगळ्या सख्या नेहमीच माझ्या केशसंभाराचं कौतुक करतात आणि काय म्हणतात ठाऊक आहे?''

''काय म्हणतात?''

''त्या म्हणतात, तू तुझे केस व्यवस्थितपणाने का ठेवत नाहीस? त्यांचा अंबाडा का बांधत नाहीस? तुझे इतके सुंदर केस हे मुक्तपणे तुझ्या कपाळावर रूळत असतात ना, त्यामुळे तुझ्या मूळच्या सौंदर्याला बाधा येते. आमचे केस तुझ्या इतके लांबसडक नसूनही आम्ही त्याचा अंबाडा बांधतो हे तू रोज पाहातेसच ना?... मग तू...''

''तू काय म्हणालीस त्यांना?''

''मी फक्त त्यांना एक प्रश्न विचारला.''

''कोणता?''

''तुमच्या केसांचा अंबाडा कोण बांधतं?''

''मग काय उत्तर दिलं त्यांनी?''

''बहुतेक जणींनी आपल्या मातेचं नाव सांगितलं.''

कृप काहीच बोलला नाही. मात्र गंभीर खचितच झाला. मलाही क्षणभर काय बोलावे सुचले नाही. मी उगाचच कृपाच्या तोंडाकडे पाहात राहिले एकटक. तो काहीतरी बोलेल म्हणून.

आणि खरंच तो बोलला. अगदी मृदू, मधुर स्वरात त्याने हाक मारली, ''कृपी''

''अं?''

''एक सांगू तुला?''

''सांग ना.''

''आपल्याला माता नाही हे तू जाणतेसच. आपण अनाथ-पोरकी. तरीही यापुढं तुझ्या या सुंदर कुंतलभाराचा अंबाडा बांधण्याचे काम मी केले तर चालेल?''

''अय्या, तू बांधणार अंबाडा?''

''हो, मग त्यात काय झाले? अगं, ज्यांच्या घरात दुसरं कुणीच नसतं ना, त्यांच्या घरात असणाऱ्या लोकांपैकी कुणी ना कुणीतरी हे काम करायलाच हवे. आपल्या घरात तर फक्त आपण दोघं. मग तुझा अंबाडा बांधण्याचे काम मी नको का करायला?'

''अरे, मग तुझे मंत्रपठण?''

''त्यात काय झाले? मी उद्यापासून आणखीन लवकर उठत जाईन. त्यामुळे तू झोपेतून उठायच्या आधी माझी नित्यनैमित्तिकं आटोपतील. तू उठून स्नानाला जाशील त्या वेळी मंत्रपठण संपेल आणि मग तुझा अंबाडा बांधायला मला अवधी मिळेल.''

कृपाच्या या आश्वासनाने मला खूपच बरे वाटले. आपल्याला माता नाही हे दुःख मी तेव्हाच विसरले. म्हणालेदेखील, ''कृपा, नाहीतरी तू माझा नुसता बंधूच नाहीस, माझी सारी नाती तुझ्यातच सामावलेली आहेत. माझ्यासाठी तू जे जे करतोस ना, ते पाहिल्यानंतर आपल्याला माता, पिता नसलेल्याचं दुःख जाणवतच नाही मला.''

दुसऱ्या दिवशी कृप खरोखरच लवकर उठलेला होता. माझे डोळे उघडण्याआधीच त्याची नित्यनैमित्तिकादी कामं आटोपली होती. मी स्नानाला गेले त्या वेळी तो आपल्या ठराविक कोपऱ्यात मृगाजिनावर पद्मासन घालून मंत्रपठणही करू लागला होता. मी ज्या वेळी स्नान करून परतले त्या वेळी त्याचं मंत्रपठण संपलेलं होते. मी काही बोलायच्या आधीच त्याने हाक मारली, ''कृपी, आटोपलं ना तुझं सारं?''

मी फक्त होकारदर्शक मान हलविली. तसा तो म्हणाला, ''मग लवकर ये इकडे. तुझा अंबाडा बांधायचा आहे ना?'' मी न बोलताच त्याच्यासमोर पाठ करून



बसले. तो माझ्या काळ्याभोर केशसंभाराला व्यवस्थित करीत होता. हे काम त्याला अगदी नवीन असल्याने त्याची खूपच त्रेधातिरपीट उडत होती. तो मधूनच विचारीत होता, ''कृपी, केस ओढले तर जात नाहीत ना तुझे?''

पण त्याला उत्तर देणं मला जमतच नव्हतं. कारण कृपाच्या स्पर्शानेच माझा ऊर भरून आला होता. माझ्या काळ्याभोर पापण्या जडावल्या होत्या. डोळ्यांत अश्रू दाटले होते आणि त्यांनी माझ्या गोऱ्या गालांवरून मुक्तपणाने वाहायलाही सुरुवात केलेली होती.

कृप आणि कृपी हस्तिनापुरातील शांतनू महाराजांचे आश्रित. केवळ त्यांच्याच कृपेने आम्हा अनाथ पोरांना दोन वेळचे अन्न आणि निवारा लाभलेला होता. आम्हाला पुरेसे अन्न देण्याची महाराजांची आज्ञाही होती. कारण आमच्याबद्दल त्यांच्या मनात कणव होती. पण आपल्या आज्ञचे उचित पालन केले जाते की, नाही हे मात्र पाहायला त्यांना मुळीच उसंत नव्हती. ते हस्तिनापुराचे महाराज होते. जनकल्याणार्थ अनेक गोष्टी करण्याची त्यांची जबाबदारी होती. आमच्यासारखे असंख्य आश्रित फक्त त्यांच्या कृपेवर जगत होते. प्रत्येकाकडे लक्ष द्यायचे ठरविले तर राज्यकारभार करणे, जनहित साधणे त्यांना अशक्य होते.

त्यांच्या आज्ञेप्रमाणे आम्हाला भोजन मिळतही होते, पण ते पुरेसे मिळत होते, असे निदान मी तरी म्हणणार नाही. कृप तृप्तीचा ढेकर देत होता. कदाचित त्याला ते पुरे असेल किंवा आपण तृप्त झाल्याचा तो बहाणा करीत असे. पण मी मात्र अतृप्त राहायची. वाटायचे, कधी शांतनू महाराज समोर उभे राहिलेच तर त्यांच्यासमोर अन्न देणाऱ्या सेवकाविरुद्ध तक्रार करावी. पण ज्या ज्या वेळी शांतनू महाराज समोर उभे राहात, त्या त्या वेळी त्यांच्यासमोर तोंड उघडणेच काय, पण नजर वर करून त्यांच्याकडे पाहाणेही जमत नसे. कळत नकळत मान खाली जात असे. त्यामुळे आम्ही तृप्तच आहोत असा समज करून घेऊन महाराज निघून जात.

मी मात्र स्वतःलाच दोष देत तशीच बसून राही.

पण त्या दिवशी प्रत्यक्ष चार घोड्यांचा रथ आमच्या पर्णकुटीच्या दारात उभा राहिला. रथातून एका सेवकाने खाली उडी घेतली. या वेळपावेतो रथाच्या आवाजाने मी आणि कृप पर्णकुटीच्या दारात येऊन पोहोचलो होतो. मात्र समोर राजसेवक उभा राहिलेला पाहाताच घाबरून मी दोन पावलं मागे सरकले. कृपही बहुतेक त्याच विचारात असावा. कारण त्याचा

भेदरलेला चेहराच तसं सांगत होता. पण त्याला मागे सरकण्याचा अवसर मिळाला नाही. कारण त्याच वेळी काहीशा कठोर स्वरात प्रश्न आला, ‘तुझे नाव कृप ना?’’

‘‘हो.’’ नम्र स्वरात कृप उत्तरला.

‘‘मग तुला माझ्याबरोबर यायला हवे.’’

‘‘कुठं?’’

‘‘राजप्रासादात.’’

कृप घाबरला. राजप्रासादातील बोलावणे येण्याचा त्याच्यावरचा हा पहिलाच प्रसंग होता. त्याच्या मनात अनेक विचार गोळा झाले. का बोलावले असेल आपल्याला राजप्रासादात? आपल्याकडून तसा कोणताही नि काहीच गुन्हा घडलेला नाही. मग राजप्रासादात बोलावणे कशासाठी यावे? त्याने साहस केले विचारले,

‘‘कुणी बोलावले आहे?’’

‘‘प्रत्यक्ष महाराजांनी. तुलाच नव्हे तुझ्या बहिणीलादेखील.’’

आता मात्र कृप अधिकच घाबरला. त्याची बोबडी वळल्यासारखे झाले. त्याने काहीतरी बोलण्यासाठी तोंड उघडले, पण त्याला बोलण्याची संधी मिळाली नाही.

कठोर शब्दात पुन्हा शब्द आले, ‘‘चला लवकर. महाराज तुमच्या दोघांच्याही प्रतीक्षेत आहेत.’’

कृपाने व्याकूळ नजरेने माझ्याकडे पाहिले. माझी नाजूक देहलता विलक्षण वेगाने कंप पावत होती. अश्रुभाराने माझ्या पापण्याही जडावल्या होत्या. माझ्या मुखातून शब्दही फुटत नव्हता.

‘‘कृपी, चल. महाराजांचीच आज्ञा आहे. आपल्याला निघायला हवं.’’ मी काहीच बोलले नाही. पण पाऊल पुढे टाकण्याचे धाडसही झाले नाही मला. भलभलते विचार मोहोळावर घोंगावणाऱ्या मधमाशांच्यासारखे माझ्या अवतीभोवती घोंगावत राहिले होते. माझ्या उरात एक अनामिक भय दाटून राहिले होते. काही केल्या माझे पाऊलच पुढे पडत नव्हते. शिवाय त्या राजसेवकाकडेही पाहाण्याचे मला धाडस होत नव्हते.

मी काहीच हालचाल करीत नाही असं पाहाताच कृप माझ्याजवळ आला. त्याने माझा नाजूक हात अलगदपणे आपल्या हातात घेतला आणि मग फक्त मलाच



ऐकू जाईल अशा आवाजात तो म्हणाला, ‘‘कृपी, राजाज्ञेचं पालन व्हायलाच हवं. शांतनू महाराज जितके कृपाळू आहेत तितकेच संतापी आहेत. राजाज्ञेचा अवमान केल्याचं त्यांच्या कानांवर गेलं तर आपल्याला मिळणारं हे दोन वेळचं अन्न, हा निवारा, सगळंच आपल्या हातून निघून जाईल आणि वृक्षापासून अलग झालेल्या आणि वाऱ्याच्या झोताने फरफटत जाणाऱ्या शुष्क पर्णासारखी आपली अवस्था होईल.’’

कृपाचे शब्द तीक्ष्ण बाणासारखे उरात रूतले. मी पाऊल उचलले, कृपाच्याच मदतीने रथावर आरूढ झाले. रथनीढेवर असलेल्या सारथ्याला राजसेवकाने आज्ञा केली.

आणि सारथ्याने वेग ओढून अश्वांना इशारा केला. अश्व चौखूर उधळले.

✦✦✦

# दोन

माझी माता कोण? पित्याचे नाव काय? माझे गाव कोणते? हे बालपणापासून मला छळणारे प्रश्न. मी या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा आजपर्यंत खूप वेळा प्रयत्न केला होता. हे प्रश्न सख्यांना विचारून त्यांच्याकडून काही माहिती मिळते का ते पाहाण्याचे धाडस माझ्या अंगी नव्हते. कृप बाहेर वावरत होता. कदाचित त्याला हे ठाऊक असण्याचा संभव होता. बोलला मात्र काहीच नाही. एकदा केवळ नाइलाजाने तो म्हणाला, 'कृपी, यापेक्षा विचारण्यासारखं तुझ्याकडं दुसरं काहीच का नाही?'

मी गप्पच राहिले. यापुढे कृपाला काहीही विचारायचे नाही असे ठरवून.

पण याचे उत्तर माझ्या स्वप्नातही नसताना मला त्या दिवशी मिळाले.

आजही तो प्रसंग जसाच्या तसा माझ्यापुढे उभा आहे.

राजसेवकासमवेत रथातून आम्ही राजप्रासादात जाऊन पोहोचलो. राजसेवकाने आम्हा दोघांनाही थेट राजदरबारात शांतनू महाराजांच्यासमोरच उभे केले.शांतनू महाराजांच्या उजव्या बाजूला एका उच्चासनावर एक अस्थिपंजर झालेला मध्यमवयीन पण तेजस्वी नजरेचा गृहस्थ बसलेला होता. त्याच्या मस्तकावरचे केस आणि



हनुवटीची लांबलचक दाढी यांतच त्याचा चेहरा बराचसा लपलेला होता. त्याच्या नजरेतलं तेजही विलक्षण होतं. माझी नजर मला नकळतच त्या तेजस्वी मुद्रेच्या गृहस्थावर स्थिरावली.

तो आमच्याकडेच पाहात होता.

'कृपा' शांतनू महाराजांची हाक ऐकू आली.

आता माझी नजर महाराजांच्याकडे वळली.

'यांना ओळखतोस?'

मुळातच घाबरलेला कृप काहीच उत्तर देऊ शकला नाही. त्याने केवळ नकारार्थी मान हलविली.

'कृपी, तू? तू तरी ओळखतेस यांना?' मला नकारार्थी मान हलविण्याचेही साहस झाले नाही. माझी नजरच घरंगळली.

'यांचे नाव शरद्वान. फार मोठे तपस्वी आहेत हे. वेदाध्ययन आणि शस्त्रास्त्रविद्या यांत प्रवीण आहेत. यांचा आश्रमही होता. कृपासारखी खूप मुले यांच्याकडे अध्ययनासाठी येत असत. कारण त्यांचा लौकिकही तसा मोठा होता, पण...'

महाराजांनी आपले बोलणे अर्ध्यावरच सोडले. मी मात्र स्वतःला विचारू लागले, 'महाराजांनी हे सारे आम्हांला सांगण्याचे प्रयोजनच काय? कृपाला यांच्या आश्रमात ठेवायचा विचार तर नाही ना महाराजांचा?' पण मी यातील काहीच विचारू शकले नाही. माझी नजर जमिनीवरच स्थिरावली होती.

'कृपा' महाराजांची हाक. ते पुढे म्हणाले, 'आज तुझ्यासमोर बसलेले हे तपस्वी दुसरे तिसरे कुणी नसून तुझे जन्मदाते – पिता आहेत.'

महाराजांचे शब्द कानांवर पडले मात्र, माझी नजर चटकन वर झाली. त्या गृहस्थांच्या मुद्रेवर स्थिरावली. ते गृहस्थही आमच्याकडे पाहात होते. काहीशा अनमिष नजरेने. त्यांच्या नेत्रकडाही ओल्या झाल्या असल्याचा मला भास झाला.

ते चटकन बसल्या जागेवरून उठले. खाली आले. कृपही तेवढ्याच आवेगाने पुढे झाला आणि मग पित्याने पुत्राला आलिंगन दिले. त्याचे अवघ्राण करीत गदगद् स्वरात ते म्हणाले, 'कृपा, ओळखलेस ना मला?'

ओळख पटणं शक्यच नव्हतं. जिथं समोरच्या गृहस्थांना मी ओळखू शकत नव्हते तिथं कृप तरी कसं ओळखणार? तो फक्त उद्गारला, 'तात!' बस्स! यापेक्षा अधिक शब्द कृपाच्या तोंडातून बाहेरच पडले नाहीत. दृढालिंगन सुटले. आता त्या

गृहस्थांनी आपला मोहरा माझ्याकडे वळवला. प्रेमाने ओथंबलेल्या स्वरात त्यांनी हाक मारली, 'कृपी' आणि आपले बाहू पसरले.

वास्तविक प्रथमच भेटलेल्या पित्याच्या मिठीत शिरण्यासाठी मी उत्सुक असायला हवे होते. एवढेच नव्हे तर तेवढ्याच आवेगाने त्यांनी बोलावण्याच्या आधीच त्यांच्या मिठीत विसावयाला हवे होते. पण का कुणास ठाऊक, माझ्याकडून तसे झालेच नाही. तेच पुढे झाले. त्यांनी स्वतःच पुढे होऊन मला आपल्या मिठीत घेतले.

पण पित्याला भेटल्याचं सुख मात्र मला मुळीच वाटले नाही.

शांतनू महाराजांच्या कृपेने हस्तिनापुरातच माझ्या पित्याने आश्रम उभा केला. या आश्रमात वेदाध्ययन आणि शस्त्रास्त्रविद्या शिकण्यासाठी राजकुमारांनी गर्दी केली. इतर आश्रमांप्रमाणे आमच्याही आश्रमाची सुरुवात झाली. यमुनेच्या काठावरचा आमचा आश्रम म्हणजे एक सुरम्य आणि शांत जागा होती. लहान लहान पर्णकुट्या अगदी व्यवस्थितपणे उभ्या होत्या. सभोवती नानाविध प्रकारच्या वृक्षांची दाटी होती. फुलांनाही काही तोटा नव्हता. शिवाय मृग, मयूर यांचा संचार चालू राहात असे. नेहमीचे राजसेवकांचे दटावणे संपले होते. एका नव्या जीवनक्रमाला सुरुवात झाली होती. आश्रमात गोधन भरपूर असल्याने दुधाला तोटा नव्हता. शांतनू महाराजांच्या कृपाप्रसादाने अन्नही भरपूर मिळत होते. कशाचीच उणीव नव्हती. मात्र नेहमीप्रमाणे कृप आणि तात सोबतीला होते.

तात भेटल्याचा खराखुरा आनंद सर्वार्थाने कृपाला झाला होता. कारण तातांचा वेदाभ्यास आणि शस्त्रास्त्रकौशल्य स्पृहणीय होते. त्यांचा मूळचा लौकिकही तसाच मोठा होता. त्यामुळे एका शास्त्राभ्यासी, शस्त्रास्त्रनिपुण आचार्यांच्याकडे हक्काने शिकण्याची संधी मिळाल्याचा खराखुरा आनंद कृपाला झाला होता. त्यात पिता भेटल्याचा आनंद असेलच असं सांगणे धाष्टर्याचं होतं.

कृप पुरुष होता. ब्रह्मचर्याश्रम संपल्यानंतर त्याला बाहेरच्या जगात वावरायचे होते. एक पुरुष म्हणूनच. आपण ब्राह्मण आहोत याचीही त्याला आता खात्री पटली होती. कारण तातांनीच ती त्याला करून दिली होती आणि ब्राह्मणाला वेदाभ्यास आवश्यक आहे, त्याने वेदांगे जाणून घेतलीच पाहिजेत असा तातांचा आग्रह होता. पण तात नुसतेच वेदाभ्यासाने संतुष्ट होणारे नव्हते. कारण त्यांचा ओढा अधिकतर शस्त्रास्त्रविद्येकडे होता. वेदांगे ते ज्या पध्दतीने शिकवत त्याच्यापेक्षाही उत्तम प्रकाराने



ते धनुर्विद्येची चारी अंगे समजावून सांगत. गदायुद्धातले कौशल्य दाखवीत. द्वंद्वयुद्धातले बारकावेही तेवढ्याच बारकाईने स्पष्ट करीत. खड्गयुद्धालाही त्यांची माघार नसे.

पुरुष म्हणून बाहेरच्या जगात वावरायचे असेल, लौकिक प्राप्त करायचा असेल, प्रतिष्ठा मिळवायची असेल तर हे सर्व आपल्याला अवगत होणे आवश्यक आहे, याची कृपाला खात्री होती आणि हे सारं शिकविणारा घरचा माणूस त्याला मिळालेला होता. माझ्यापेक्षा तातांच्यावर त्याचं प्रेम अधिक होतं, त्याचं कारण खऱ्या अर्थानं हेच होतं.

पण मी मात्र एक स्त्री होते. सारंच काही समजत नसलं तरी काहीशी समजूत आलेलं वय होतं माझं. योग्य-अयोग्य, उचित-अनुचित काही अंशी कळत होतं मला आणि म्हणूनच तातांच्याकडे पाहाण्याचा माझा दृष्टिकोन काहीसा वेगळाच होता. तातांच्याबद्दल प्रेम वाटण्याऐवजी काहीशी घृणाच निर्माण झाली होती माझ्या मनात आणि त्याचं कारण होतं माझं जन्मरहस्य.

माझ्या कानांवर आलं होतं ते.

माझे पिता शरद्वान हे गौतमाचे पुत्र. ब्राह्मणकर्म आणि क्षत्रियकर्म या दोन्ही कर्मांत ते निष्णात होते. तरीही वेदाध्ययनापेक्षा धनुर्विद्येकडे त्यांचा अधिक ओढा होता. ध्यानधारणेपेक्षा शस्त्रविद्येचे चिंतन करण्यात ते बराच काळ रमून जात. साहजिकच त्यांच्या या पराक्रमाने आणि शस्त्रास्त्रविद्येतील कौशल्याने प्रत्यक्ष देवाधिदेव इंद्राला भीती वाटू लागली. शरद्वानाच्याकडून आज ना उद्या आपल्या सत्तेला धोका आहे, याची ज्या वेळी इंद्राला खात्री पटली त्या वेळी कपट कारस्थानी इंद्राने जानपदी नावाच्या अप्सरेला पाचारण केले. तिला आपल्या कपट कारस्थानाची ओळख करून दिली, बारकावे समजावून सांगितले आणि जानपदी निघाली. एक कपटी, पण महत्त्वाची जबाबदारी शिरावर घेऊन.

शरद्वान नदीतीरावरून परतत असताना संध्यासमयी एका सुंदर तरुण स्त्रीला पाहून अडखळले. आपलं स्वत्व विसरले. आपला पराक्रम, शस्त्रास्त्रविद्येतील नैपुण्य, तपश्चर्या, आपण केलेले परिश्रम या साऱ्यांचा विसर पडला त्यांना. ते तिच्या असामान्य लावण्यावर लुब्ध झाले आणि मग स्वतःला हरवून तिच्या स्वाधीन झाले. फुलात हरवलेल्या गंधासारखे.

याचा परिणाम व्हायचा तोच झाला. इंद्राचे कपटकारस्थान फळाला आले. जानपदीने आपल्या शिरावर घेतलेली जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडली.

शरद्वानांचे डोळे उघडले, पण आता फार उशीर झाला होता. जानपदी जशी आली होती, तशी अकस्मात निघून गेली होती. पण तिचे अस्तित्व मात्र मागे होते. शरद्वानांच्या पर्णकुटीत दोन जुळी नवजात अर्भके टाहो फोडून रडत होती, आक्रंदत होती - आपले इवले इवले हातपाय हलवीत...

काहीही झालं तरी शरद्वान त्या अर्भकांचे पिता होते. जानपदीसारख्या अप्सरेने झिडकारले असले तरी शरद्वान माणूस होते. मर्त्यलोकातला माणूस. वेदांगाचा अभ्यास केलेला, जीवनमूल्ये जाणणारा, माया, ममता, प्रेम, जिव्हाळा आदी भावभावनांचं मोल करणारा.

आपल्याकडून प्रमाद घडला आहे, याची जाणीव होऊनही त्यांनी आपला प्रमाद टाळणे म्हणजे स्वतःतील माणूसपण मारणे असेच होते. प्रमादाने पश्चात्तापदग्ध झालेल्या शरद्वानांनी अखेर आपल्यातील माणूस खरंच मारला. टाहो फोडून आक्रंदणाऱ्या दोन नवजात अर्भकांना आपल्या पर्णकुटीत तसेच टाकून ते निघून गेले.

इंद्र आणि शरद्वान दोन पराक्रमी पुरुष सत्तेच्या मोहात गुरफटले. अपराध त्यांनी केला पण त्याचे प्रायश्चित्त मात्र त्या दोन नवजात अर्भकांना भोगावे लागले.

माझे जन्मरहस्य मला कळले आणि मग मीच स्वतःला विचारू लागले, 'वेदाभ्यास आणि वेदांगांचे ज्ञान प्राप्त झालेला माणूस, माणूस राहातच नाही म्हणे. त्याला देवत्व प्राप्त होतं. इंद्रियांवर ताबा येतो. विवेक मोलाचा वाटू लागतो. प्रत्येक हालचालीला एक अलौकिक अशी मर्यादा येते. जगाकडे पाहाण्याचा दृष्टिकोन बदलतो. काम-क्रोधादी षड्‌रिपुंपासून तो अलिप्त बनतो आणि माणसाशी माणसासारखा वागतो.

पण स्वतःला वेदाभ्यासी म्हणवून घेणारा, शस्त्रास्त्रविद्याकुशल म्हणून लौकिक प्राप्त झालेला हा माणूस केवळ एका लावण्यवतीच्या दर्शनाने घायाळ होतो. तिला पाहाताक्षणीच आपली वर्षानुवर्षांची तपश्चर्या विसरतो. एखाद्या सर्वसामान्य माणसासारखा विषयांध बनतो आणि मग केवळ एका स्त्रीच्या कमनीय नाजूक शरीराचा स्वाद लुटण्यासाठी तिच्या मिठीत आपली सिद्धी गमावून बसतो. हे स्वतःला वेदाभ्यासी समजणाऱ्या माणसाला शोभून दिसणारं होतं का? एवढा लौकिक नि इतकं मोठेपण प्राप्त झालेल्या माणसानं हे इतकं घसरणं, इतकं नीच कर्म करणं, उचित होतं का? मग अशा माणसाबद्दल आदर का वाटावा? का जवळीक निर्माण व्हावी.'



कधी कधी मोठा माणूसही घसरतो. त्याचाही तोल जातो. क्षणमात्र का होईना मोहात गुरफटतो. पण त्याचा हा प्रमाद, अपराध... त्याला त्याची जाणीव झाली असली तरी तो क्षम्य तरी ठरतो.

पण या माणसाने केलेला अपराध नि त्यानंतरची त्याची क्रूर वर्तणूक! माणूस म्हणवून घेणाऱ्याला ती शोभून दिसणारी होती का?

क्षणिक सुखाच्या मोहात अडकून व्यभिचार करायचा आणि मग निसर्गनियमांस अनुसरून काही भलतंसलतं घडलंच तर धाडसानं त्याचा स्वीकार न करता एखाद्या केरकचऱ्यासारखं ते उकिरड्यात फेकून देऊन आपण जणू या गावचेच नाही हे दाखवून देण्यासाठी आणि आपला संभावितपणा सुरक्षित ठेवण्यासाठी पाठ फिरवून चालू लागायचे, याला का पौरुषत्व समजतात? याला मानवधर्म म्हणतात?

रस्त्यावरून अनाथ म्हणून रडत जाणाऱ्या एखाद्या निराश्रित जिवालाही आपण चटकन उचलून घेतो, त्याचे अश्रू पुसतो, त्याला धीर भरोसा देतो, शाब्दिक का होईना, त्याला सहानुभूती दाखवितो. शरसंधानाने विद्ध झालेल्या पक्ष्याची तडफड बघूनही आपल्या डोळ्यांत अश्रू उभे राहातात, कुणाच्या पायात काटा रूततो नि पाहाणाऱ्याला वेदना होतात हा खरा मानवधर्म. ही खरी माणुसकी.

आणि इथं नऊ मास नऊ दिवस ओझं वाहणारी आणि मातृत्व लाभलेली स्त्री पोटचा गोळा आपला नव्हेच अशा पद्धतीने दूर करून निघून जाते आणि याचं उत्तरदायित्व ज्याच्या शिरावर तो पुरुषही हे सारं आपलं नव्हेच या आविर्भावात निघून जातो हा दैवदुर्विलासच नाही का? मानवजातीला कलंकच नाही का?

हे आणि असेच विचार नेहमीच माझ्या मनात घोटाळत राहात होते, मला अस्वस्थ करीत होते, माझं स्वास्थ्य माझ्यापासून हिरावून घेत होते.

एक दिवस मी कृपाला म्हणाले, 'कृपाऽऽ'

'काय गं?'

'अलीकडे तूही मला पारखा होत चालला आहेस.'

'कशावरून म्हणतेस तू हे?'

'तुझ्या वर्तणुकीवरून.'

'काय करतो मी?'

'पूर्ण दिवस वेदाध्ययन नि शस्त्रास्त्रविद्या यातच रममाण झालेला असतोस तू. सबंध दिवस-दिवसभर तू पर्णकुटीकडे डोकावूनही पाहात नाहीस. मी खाते की